




दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२६ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । गुरूवार १७ /०९/२०२६ । पाने - ६







# अमली पदार्थ प्रकरणाला नवे वळण; पोलिसांवरच गंभीर आरोप

## मुलाला खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचा पित्याचा दावा; सीसीटीव्ही फुटेजसह एसपींकडे तक्रार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या अमली पदार्थ बाळगल्याच्या गुन्ह्याला आता नवे वळण मिळाले आहे. हा गुन्हा खोटा असून, पोलिसांनी विरोधकांशी संगनमत करून आपल्या मुलाला या प्रकरणात अडकविल्याचा गंभीर आरोप असद रऊफ कुरेशी यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार अर्ज दाखल करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

असद कुरेशी यांनी तक्रारीत केलेल्या दाव्यानुसार, त्यांचा मुलगा काशिफ याचे त्याच्या काही मित्रांशी पूर्वीपासून मतभेद होते. मात्र, काही दिवसांपासून या तिघांकडून काशिफशी पुन्हा जवळीक साधण्याचे प्रयत्न सुरु होते.

३ सप्टेंबर रोजी व्यवसायाच्या चर्चेच्या बहाण्याने काशिफला संगमनेर बसस्थानक परिसरातील जगदंबा टी सेंटर येथे बोलाविण्यात आले. तेथे काशिफ संबंधित तिघांसोबत चर्चा करीत असताना तौसिफ काही वेळासाठी त्याच्या स्कुटरजवळ गेला. त्याने स्कुटरच्या ग्लो बॉक्समध्ये पांढऱ्या रंगाचे पाकीट ठेवल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत असल्याचा दावा कुरेशी यांनी तक्रारीत केला आहे.

त्यानंतर फौजदार सावंत यांनी काशिफचा पाठलाग करून त्याची तसेच स्कुटरची झडती घेतली. त्या वेळी काहीही आक्षेपार्ह आढळले नाही, असा तक्रारदाराचा दावा आहे. मात्र, त्यानंतर काशिफला पुन्हा जगदंबा टी सेंटर परिसरात नेण्यात आले आणि तेथे अमली पदार्थ जप्त केल्याचे दाखवून गुन्हा दाखल करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या संपूर्ण घटनेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज, छायाचित्रे तसेच ई-मेलची प्रत तक्रारीसोबत जोडण्यात आल्याचे कुरेशी यांनी नमूद केले आहे. तसेच ३ सप्टेंबर रोजी संबंधित व्यक्तींमध्ये झालेल्या मोबाईल संपर्कांचे तपशील, कॉल डिटेल रेकॉर्ड तसेच संबंधितांचे लोकेशन तपासण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याने आता पोलीस प्रशासन या तक्रारीची कशा पद्धतीने चौकशी करते, याकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

संपूर्ण प्रकरणाची सक्षम अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करावी, संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर निलंबन व बदलीची कारवाई करावी तसेच कटात सहभागी असल्याचा आरोप असलेल्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी असद कुरेशी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

दरम्यान, तक्रारीतील आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नसून, पोलिसांची बाजू समोर आल्यानंतरच या प्रकरणाचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

# जरांगेंच्या उपोषणाचा १९ वा दिवस

## प्रकृती खालावली; वडिलांनी सांगूनही उपचारास नकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीगोंदा- मनोज जरांगेंच्या उपोषणाचा आज १९ वा दिवस आहे. पाणी आणि सलाईन बंद केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. आज बीडमधील पाटोद्यातून ते अहिल्यानगरच्या श्रीगोंद्यात मुक्कामी जाणार आहे. काल रात्री अडीच वाजता त्यांनी मराठा समाज बांधवांना मार्गदर्शन केले आहे. यानंतर आता पोलिसांकडून सुरक्षेच्या कारणास्तव त्यांच्या गाडीची तपासणी करण्यात आली आहे. अहिल्यानगरात होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन श्रीगोंदे शहर व तालुक्यात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रांगे पाटील आज रात्री श्रीगोंदे शहरातील बाजार तळ परिसरात दाखल होणार असून तेथे त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. बंदोबस्तात पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी व सर्व पोलिस निरीक्षकांसह ५० अधिकारी, ३५० पोलिस कर्मचारी, एसआरपीएफची एक तुकडी आणि दंगल नियंत्रण पथकाची एक तुकडी तैनात करण्यात आली आहे.

दरम्यान, पोलिस अधीक्षक सुदर्शन यांनी मंगळवारी सायंकाळी श्रीगोंद्यात भेट देऊन अधिकाऱ्यांची बैठक घेतली वदौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सूचना दिल्या. दोन दिवसांपूर्वीही त्यांनी श्रीगोंद्यात येऊन तयारीचा आढावा घेतला होता. बाजार तळ परिसरात मराठा बांधवांकडून स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी मराठा समाजाकडून सुरू असलेली तयारी पाहता श्रीगोंद्यात राजकीय-सामाजिक वातावरण तापण्याची शक्यता आहे.प्रशासनासाठी गर्दीचा उत्साह कायम ठेवत कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक सुरळीत ठेवणे हीच खरी कसोटी असेल.

# राजस्थान युवक मंडळ संगमनेर फेस्टिवल

## सहा दिवस रंगणार सांस्कृतिक कार्यक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : राजस्थान युवक मंडळ, मालपाणी उद्योग समूह, शहरातील विविध गणेशोत्सव मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून आयोजित करण्यात आलेल्या 'संगमनेर फेस्टिवल'ची जय्यत तयारी झाली असून, संगमनेरकरांसाठी सलग सहा दिवस विविध दर्जेदार सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांची मेजवानी उपलब्ध होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष मनिष मालपाणी यांनी दिली आहे.

राजस्थान युवक मंडळाच्या वतीने गेल्या १८ वर्षांपासून संगमनेर फेस्टिवलचे आयोजन करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहरातील नागरिकांना एकत्र आणत सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनाच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करण्याचे काम या फेस्टिवलच्या माध्यमातून केले जाते. यंदाच्या फेस्टिवलची सुरुवात बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता प्रसिद्ध अभिनेते समीर चौघुले यांच्या 'सम्या सम्या मैफिलीत माझ्या' या कार्यक्रमाने होणार आहे. गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी 'दिल से' आर्केस्ट्रा रसिकांचे मनोरंजन करणार आहे. शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी 'राजदा - एक अविस्मरणीय सुरेल सुफी मैफिल' आयोजित करण्यात आली आहे. शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी 'आता थांबायचं कसं?' हे प्रभावी सामाजिक नाटक सादर होणार असून, रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध अभिनेते संजय नार्वेकर यांच्या प्रमुख भूमिकेने सजलेले 'भ्रमाचा भोपळा' हे नाटक रंगणार आहे. तर सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी 'नाना, थोडं थांबा ना!' या विनोदी नाटकाने फेस्टिवलची सांगता होणार आहे. सर्व कार्यक्रम लक्ष्मी रोड येथील मालपाणी लॉन्स येथे दररोज सायंकाळी ६.३० वाजता होणार आहेत.

# रुग्णालयांतील वैद्यकीय साहित्यातून प्रचंड लुटमार

## किमतीत तब्बल २,८४१ टक्क्यांपर्यंत तफावत, तुकाराम मुंढेंची केंद्राकडे धाव

मुंबई (वृत्तसंस्था)

खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय साहित्याच्या खरेदी किमती आणि रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या किमतीतील प्रचंड तफावत महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या पाहणीत समोर आली आहे. काही वैद्यकीय उपकरणांच्या बाबतीत ही तफावत तब्बल २,८४१ टक्क्यांपर्यंत असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. या धक्कादायक आकडेवारीची दखल घेत महाराष्ट्र एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारच्या औषधनिर्माण विभागासह राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाकडे दररचनेचा आढावा घेण्याची मागणी केली.

'मिंट'च्या वृत्तानुसार, १० ऑगस्ट रोजी मुंढे यांनी केंद्राकडे पत्र पाठवून वैद्यकीय उपकरणांच्या खरेदी आणि विक्री किमतीतील मोठ्या फरकाचा आढावा घेण्याची तसेच आवश्यक नियामक उपाययोजना करण्याची विनंती केली. ट्रेड मार्जिनला मर्यादा घालणे, अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांना संरचित किंमत देखरेखीखाली आणणे आणि खरेदी किंमत व घोषित चठझमधील तफावत नियंत्रित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, अशा उपायांचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील सर्वेक्षणात रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या आयव्ही इन्फ्युजन सेट, सिरिंज, नेब्युलायझर, ऑक्सिजन मास्क आणि कॅथेटर यांसारख्या वस्तूंच्या किमतींची तुलना करण्यात आली. खासगी रुग्णालयांनी या वस्तू कोणत्या दराने खरेदी केल्या आणि त्यावर किती चठझ किंवा रुग्णांकडून किती रक्कम आकारली, याचा अभ्यास करण्यात आला.

या पाहणीत ११.०५ किमतीला खरेदी केलेला खत इन्फ्युजन सेट रुग्णाला ३२५ आकारण्यात आल्याचे नमूद आहे. तसेच २९.४१ ला खरेदी केलेल्या कॅथेटरची एमआरपी ३१० असल्याचे आढळले. याशिवाय सुमारे ६.७५ किमतीच्या सिरिंजवर ५७.२० एमआरपी असल्याचेही आकडे समोर आले आहेत.

या प्रकाराबाबत बोलताना तुकाराम मुंढे यांनी हा केवळ किंमतीतील फरकाचा मुद्दा नसून रुग्णांच्या संरक्षणाशी संबंधित प्रश्न असल्याचे स्पष्ट केले. उपचाराच्या काळात रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना एखाद्या वैद्यकीय वस्तूची प्रत्यक्ष खरेदी किंमत, त्यातील मध्यस्थांचे मार्जिन आणि रुग्णालयाकडून आकारला जाणारा दर यांची तुलना करणे अनेकदा शक्य होत नाही. त्यामुळे या क्षेत्रात अधिक पारदर्शकतेची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, या प्रकरणाची छझझ-कडूनही तपासणी सुरू असल्याचे वृत्त आहे. उत्पादक आणि मध्यस्थांकडून वैद्यकीय उपकरणांच्या किंमतीत किती मार्जिन जोडले जाते, याचा आढावा घेतला जात आहे. कंपन्यांनी सादर केलेली कागदपत्रे, अंतर्गत किंमत यादी आणि महाराष्ट्रातील सर्वेक्षणातील निष्कर्ष यांची तुलना केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी 'मिंट'ला सांगितले. पंजाब, राजस्थान आणि तामिळनाडू येथूनही अशाच स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे वृत्त आहे.













# गणेश मंडळाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागातर्फे १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या प्रमुख व मानाच्या गणेश मंडळांच्या ठिकाणी 'लोकसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. शासनाच्या योजनांची माहिती देण्यासोबतच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि नागरिकांशी थेट संवाद साधणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या उपक्रमात कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांचा सहभाग राहणार आहे. शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट, शिष्यवृत्ती व उच्च शिक्षणाच्या योजनांची माहिती नागरिकांना दिली जाणार आहे.

आरोग्य विभागामार्फत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह विविध आरोग्य सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योतीच्या योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार आणि 'आपले सरकार' यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती केली जाणार आहे. स्थानिक क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय अधिकारी व तज्ज्ञ गणेश मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना योजनांची अधिकृत माहिती व मार्गदर्शन करतील. कार्यक्रमांना सोशल मीडियाच्या माध्यमातूनही व्यापक प्रसिद्धी देण्यात येणार असून, शक्य असेल तेथे फेसबुक व युट्यूब लाईव्ह करण्यात येणार आहे.

# सिद्धार्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक रघुनाथ जगताप यांना 'गुणवंत मुख्याध्यापक' पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्हा परिषद आणि अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणारा 'गुणवंत मुख्याध्यापक' पुरस्कार यावर्षी संगमनेर तालुक्यातील सिद्धार्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक रघुनाथ मल्हारी जगताप यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेसह विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

श्री. जगताप यांनी बहुजन शिक्षण संघामध्ये तब्बल ३४ वर्षे सेवा केली आहे. महात्मा फुले विद्यालय, घुलेवाडी येथून त्यांच्या शैक्षणिक सेवेची सुरुवात झाली. इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजना व उपक्रम विद्यालयासह तालुक्यातील विविध शाळांमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सिद्धार्थ विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध प्रकल्प, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम विद्यालयात राबविले. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकास, सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विविध विषयांतील आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या सातत्यपूर्ण शैक्षणिक योगदानाची दखल घेऊन त्यांना 'गुणवंत मुख्याध्यापक' पुरस्काराने गौरविण्यात आले.

अहिल्यानगर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या शुभहस्ते रघुनाथ जगताप यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात, उत्कर्षाताई रुपवते, माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे, बहुजन शिक्षण संघाचे कार्यकारी विश्वस्त संघराज रुपवते, सर्व विश्वस्त व सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांनी रघुनाथ जगताप यांचे अभिनंदन केले आहे.

# विश्वकर्मा पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सभा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - 'एक समाज, एक विचार, प्रगतीचा निर्धार' या ध्येयाने सामान्य कारागीर, छोटे व्यावसायिक व सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेरची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे चेअरमन श्री. संपत दत्तात्रय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली विश्वकर्मा समाज महादेव मंदिर सभागृह, सुतार गल्ली येथे झालेल्या सभेस नाशिक येथील स्वराज सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अमोलजी बाळासाहेब भागवत तसेच श्री. सुधाकरजी जोशी, चेअरमन, भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँक, घुलेवाडी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने उल्लेखनीय आर्थिक प्रगती साधली. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेच्या ठेवी २० कोटी ५ लाख ७० हजार रुपये, कर्ज १६ कोटी ९२ लाख २५ हजार रुपये, तर गुंतवणूक ७ कोटी ७६ लाख ९७ हजार रुपये झाली आहे. संस्थेला यावर्षी ३८ लाख ५६ हजार रुपयांचा नफा झाला असून, थकबाकी व एनपीएचे प्रमाण अत्यल्प आहे. आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार, सुरक्षित कर्जवाटप आणि प्रभावी कर्जवसुलीमुळे संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम झाली आहे.

सामान्य कारागीर व छोट्या व्यावसायिकांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने संस्थापक चेअरमन कै. भास्करराव वाकचौरे, कै. के. एम. भालेराव, कै. रामदास जानवेकर व कै. मुरलीधर गोरे यांच्या पुढाकारातून १९९२ मध्ये संस्थेची स्थापना झाली. आज संस्था स्वमालकीच्या इमारतीत व स्वभांडवलावर कार्यरत आहे. गेल्या २२ वर्षांपासून संस्था संगणकीकृत असून सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त करत आहे. संस्थेला सलग तीन वर्षे बँको पुरस्कार मिळाला आहे. सभासदांना जलद व सुरक्षित सेवा मिळावी यासाठी क्यूआर कोड, एसएमएस बँकिंग आदी डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वार्षिक सभेच्या निमित्ताने सभासदांच्या पाल्यांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे संचालक ॲड. राजू बबनराव खरे, चि. आदित्य संतोष गोरे, वैष्णवी राजू खरे आणि चि. स्वरेश सुधीर गाडेकर यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे अमोलजी भागवत यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन केले. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरूपात सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. श्री. सुधाकरजी जोशी यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीचे, सभासदाभिमुख कारभाराचे व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

सभेच्या प्रारंभी व्हा. चेअरमन विजय सूर्यवंशी यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुणे व संचालक मंडळाच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. महेश सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला, तर अहवाल सालात दिवंगत झालेल्यांना कैलास क्षीरसागर यांनी श्रद्धांजली अर्पण केली. वार्षिक सभेचे कामकाज व्यवस्थापक अरुण उदमले यांनी पाहिले. सभेत डॉ. गोरक्ष राऊत, भाऊसाहेब क्षीरसागर, विजय घेवारे, किरण वाकचौरे, साहेबराव क्षीरसागर आदी सभासदांनी विविध प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांना चेअरमन संपत सूर्यवंशी, श्री. देविदास गोरे व राजेश वाकचौरे यांनी समाधानकारक उत्तरे दिली. सभासदांच्या हिताचा विचार करून यावर्षी १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

संस्थेच्या प्रगतीबद्दल सभासदांच्या वतीने चेअरमन संपत सूर्यवंशी व कर्मचारी वर्गाचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार, हितचिंतक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेश वाकचौरे सर व विलास सूर्यवंशी यांनी केले. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राज्यात दुष्काळी स्थितीचे पंचनामे ५ ऑक्टोबरपासून; मुख्यमंत्र्यांचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्यात मोसमी पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पंचनामे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार असले तरीही टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होईल. दरम्यान, देशातून मोसमी पावसाच्या परतीच्या प्रवासाला पश्चिम राजस्थानातून १९ सप्टेंबरपासून सुरुवात होण्याची शक्यता आहे. देशभरात १ जून ते १४ सप्टेंबरदरम्यानच्या १५ टक्के पावसाची तूट तर महाराष्ट्रात हे प्रमाण १६ टक्के आहे.

मोसमी पावसाने ऑगस्ट - सप्टेंबरमध्ये ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम अडचणीत आला असून, लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यावर



मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आपत्ती निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार दुष्काळी स्थितीचे पंचनामे ५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपली आहेत. कमी दिवसांत येणारी मूग, मटकी, चवळी यांसारखी कडधान्ये पिके वाया गेली आहेत. सिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी पिकांची काढणी करून काही हाती लागेल, अशी स्थिती नाही. उसाची वाढ खुंटली आहे. उसाच्या नव्या लागणी पाण्याअभावी अडचणीत आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे, अशी एकमुखी आग्रही मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे सोमवारपासून मराठवड्यातील दुष्काळी स्थितीची पाहणी करणार आहेत. अकोला, वाशीम, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत पहिल्या टप्प्यात पाहाणी करतील. दुसऱ्या टप्प्यात अहिल्यानगर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत पाहणी करणार आहेत.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

**स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (डींरपवींळश्रश्र -सीशशाशपीं) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला. हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली.

१९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला.

भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.



**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. १७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**प्रवीण टाके**
उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जाती-धर्माच्या विचारांसोबत भाषेतही एकता हवी

## हिंदीचा विरोध न करता प्रचार-प्रसार करा; मुख्याध्यापक दिलीप वाकचौरे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : समाजात जात-धर्माच्या विचारांसोबत भाषेच्या माध्यमातूनही एकता निर्माण होणे गरजेचे आहे. हिंदी ही देशातील जनसामान्यांना जोडणारी प्रेमाची भाषा असून, भाषेचा विरोध करण्याऐवजी तिचा सन्मान, प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. हिंदीमुळे देशातील विविध भागांतील नागरिकांमध्ये बंधुभाव आणि एकतेची भावना दृढ होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी वेळेचे महत्त्व ओळखून सकारात्मक विचारसरणी अंगीकारत आत्मविश्वासाने जीवनात पुढे जावे, असे प्रतिपादन माजी मुख्याध्यापक दिलीप वाकचौरे यांनी केले.

संगमनेर साहित्यिक मंडळाच्या नवीन मराठी शाळेत हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी वाकचौरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत जीवनातील विविध अनुभव आणि प्रेरणादायी उदाहरणे सांगितली.

वाकचौरे म्हणाले, चेहऱ्यावर नेहमी हास्य ठेवा आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहा. केवळ मान खाली घालून चालण्यात यश नाही; जीवनात पुढे जाण्यासाठी आत्मविश्वासाने मान वर करून वाटचाल करणे आवश्यक आहे. देशाच्या विविध भागांत प्रवास करताना त्या-त्या राज्याच्या भाषेबरोबरच हिंदीचेही ज्ञान आत्मसात करा. हिंदी ही देशाच्या एकतेची मजबूत कडी आहे.

आज प्रत्येक विषयावर वाद-विवाद आणि मतभेद निर्माण होताना दिसतात. भाषा हा विरोधाचा विषय न बनवता जनजागृती आणि राष्ट्रीय एकतेचे माध्यम बनविले पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेळेची किंमत ओळखून वेळेसोबत बदल स्वीकारला पाहिजे. जीवनात सकारात्मक बदल घडवून आणताना खोटे बोलणे टाळले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यार्थ्यांना देशाचे उज्ज्वल भविष्य संबोधत वाकचौरे म्हणाले, उडाण पंखांनी होत नाही, तर हौसल्यांनी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, मेहनत आणि सकारात्मक विचारांच्या बळावर आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी. कार्यक्रमास माजी प्राचार्य शशांक गंधे, संचालक रमेश सराफ, अध्यक्ष ज्ञानेश्वर गोंटे, प्रा. सुरेश परदेशी, सय्यद आसिफअली, महेश गोडसे, कारभारी देव्हारे, मुख्याध्यापक रावसाहेब शेरमाळे, प्रकल्प प्रमुख शेख ईद्रीस, नीलिमा बोबडे, बाळू गुंजाळ, मीना डहाळे, दत्तू लांडगे, जनार्दन भरीतकर, भाऊसाहेब गायकवाड, शोभा जाधव, राहुल सूर्यवंशी, संजय कुलकर्णी, लहानू मांडे, लक्ष्मण गोडगे, महेश मुर्तडक यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय आव्हाड यांनी केले. गायक प्रा. सुरेश परदेशी यांनी हिंदी चित्रपटातील विविध गाणी सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. उत्साहपूर्ण वातावरणात हिंदी दिनाचा कार्यक्रम पार पडला.

# साप हा शेतकऱ्याचा शत्रू नसून निसर्गाचा आणि शेतीचा मित्र - सर्पमित्र सचिन गिरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सापांविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा तसेच सर्पदंशाबाबतची भीती, अंधश्रद्धा व गैरसमज दूर व्हावेत, या उद्देशाने सर्पमित्र सचिन गिरी यांचे 'सर्प समज व गैरसमज' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघाचे डॉ. अमित ढोले, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सर्पमित्र सचिन गिरी यांनी सापांच्या विविध प्रजाती, त्यांची वैशिष्ट्ये व अधिवास याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. आपल्या परिसरात आढळणारे साप ओळखण्याच्या पद्धती सांगतानाच साप दिसला म्हणून घाबरून न जाता सुरक्षित अंतर राखावे आणि त्याला न मारता सर्पमित्रांच्या मदतीने त्याची सुरक्षित सुटका करावी, असे आवाहन त्यांनी केले.

साप उंदीर आणि अन्य पिकांचे नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवत असल्याने तो शेतकऱ्याचा महत्त्वाचा मित्र आहे, असे सांगत त्यांनी शेती आणि पर्यावरणाच्या समतोलामध्ये सापांचे असलेले महत्त्व स्पष्ट केले. सापांविषयी समाजात प्रचलित असलेले विविध गैरसमज त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. साप दूध पितात, साप सूड घेतात, सापाला पाहिलेला माणूस ओळखता येतो, अशा अनेक अंधश्रद्धा व गैरसमजांना त्यांनी शास्त्रीय माहितीच्या आधारे खोडून काढले. सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक आहे, याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी सापांच्या प्रजाती, सर्पदंश, विषारी-अविषारी साप आणि सापांपासून घ्यावयाची काळजी यासंदर्भात अनेक प्रश्न विचारले. सचिन गिरी यांनी विद्यार्थ्यांच्या शंका व प्रश्नांचे समाधानकारक निरसन केले.

# बिहारमध्ये पुराचा कहर

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. बिहारमधील १५ जिल्ह्यांतील ५७५ पंचायतींमधील अंदाजे ५० लाख लोक अजूनही पुराच्या पाण्याने प्रभावित झाले आहेत. दरम्यान, हवामान विभागाने बिहारमधील २६ जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. काही भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. पूरग्रस्त भागात केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथक आज नुकसानीचा आढावा घेण्यासाठी दौरा करणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून अधिकाऱ्यांना केंद्रीय पथकाला नुकसानीची अचूक माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेशातील अनेक नद्यांना आलेल्या पुरामुळे २६ जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे.

# गुंजाळवाडीत गुरूवारी अण्णा महाराज यांचा द्वितीय समाराधना दिनाचे आयोजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - परमपूज्य श्री श्री श्री विश्वचैतन्य सद्गुरु नारायण महाराज अण्णा यांच्या आशीर्वादाने व परमपूज्य टेंबे स्वामी यांच्या मार्गदर्शनाने श्री दत्त देवस्थान सेवाभावी ट्रस्ट, निर्मल नगर, संगमनेर महाविद्यालयासमोर, गुंजाळ वाडी, संगमनेर येथे परमपूज्य श्री क्षेत्र नारायणपूर देवस्थानचे श्री अण्णा महाराज यांच्या द्वितीय समाराधना दिनानिमित्त पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे.

सायंकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तिमय कार्यक्रम होणार आहे.

सोहळ्यात सायंकाळी ५ ते ६ या वेळेत रुद्राभिषेक, ६ ते ६.३० वाजता भजन, तर सायंकाळी ६.३० ते ७.३० वाजता ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे आचार्य महाराज यांचे प्रवचन होणार आहे.त्यानंतर सायंकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत सद्गुरु नारायण महाराज यांचे कार्य, जीवनदर्शन व चारधाम निर्मिती यावर आधारित चित्रफीत दाखविण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या कार्याचे विश्लेषण करण्यात येणार असून, उपस्थित मान्यवरांचा सत्कार व मान्यवरांची मनोगतेही यावेळी होणार आहेत.

या पुण्यस्मरण सोहळ्याच्या माध्यमा तून सद्गुरु नारायण महाराज यांच्या अध्यात्मिक कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा व शिकवणीचा जागर करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक व आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन असून, या सोहळ्यास संगमनेर परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दत्त सेवेकरी शिष्य व निर्मल नगर, गुंजाळवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले

# जिल्हास्तरीय योग स्पर्धेत स्ट्रॉबेरीच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

## सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई; विद्यार्थ्यांच्या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शौर्य फाउंडेशन, संगमनेर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय योग स्पर्धा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी अभिनव स्कूल, अकोले, अहिल्यानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट कौशल्याची छाप उमटवली.

स्पर्धेत स्ट्रॉबेरीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची अक्षरशः लयलूट केली. हस्ती पटेल हिने कांस्यपदक पटकावले, तर शुभाश्री खटवा हिने सुवर्णपदक मिळवून आपल्या उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. स्वरा भवर हिने रौप्य व कांस्यपदक मिळविले. देवांश नेहे याने रौप्यपदक, तर मीताक्षी वखारिया हिने सुवर्ण व रौप्यपदक पटकावून शाळेचा गौरव वाढविला. रिचल अंबरे आणि सुशांत जगनर यांनीही स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सहभाग प्रमाणपत्र मिळविले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. अभ्यासाबरोबरच योग, क्रीडा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला शाळेत सातत्याने प्रोत्साहन दिले जाते, याचे हे यशस्वी उदाहरण ठरले.

विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी योग्य मार्गदशन व प्रशिक्षण देणारे मा. श्री. आशुतोष सर यांचा मोलाचा सहभाग आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण सराव, शिस्त, एकाग्रता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल शाळेच्या प्राचार्यांनी तसेच संस्थेच्या अध्यक्षा मा. डॉ. संज्योत वैद्य यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, दाखविलेली चिकाटी आणि स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच भविष्यातही विविध योग व क्रीडा स्पर्धांमध्ये उत्तुंग यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

योग म्हणजे केवळ शारीरिक व्यायाम नव्हे; तर शरीर, मन आणि विचार यांना सशक्त, संतुलित आणि सकारात्मक बनविण्याची जीवनपद्धती आहे, या विचाराला अनुसरून स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा व योग क्षेत्रातील वाटचालीला निश्चितच नवी ऊर्जा मिळाली आहे.

# राजापूरध्ये बालकांसह मातांसाठी पोषण मेळावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - राजापूर येथील बिट राजापूर केंद्र, चाव्हरमळा येथे जन्मपूर्व अवस्थेपासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकांसह मातांसाठी नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळावा व पोषण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बाल विकास प्रकल्पाचे मुख्य अधिकारी एन. जी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली झालेला हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

बालकांचे आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सर्वांगीण विकासाबाबत जनजागृती करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजापूर बिटाच्या पर्यवेक्षिका श्रीमती वाकचौरे व्ही. ए. होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच श्री. सोमनाथ हासे, माजी सरपंच श्री. बादशाह हासे, माजी सरपंच सौ. शैलाताई हासे, श्रीमती पवार एस. एस. व श्रीमती पाटील एस. सी. उपस्थित होत्या.

यावेळी मान्यवरांनी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य पोषण, आहारातील विविधता, पुरेशा प्रमाणात प्रथिने, आरोग्याची काळजी आणि चांगले संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. श्रीमती वाकचौरे व्ही. ए. यांनी बालकांचे पोषण, संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्याची निगा तसेच बालकांची वाढ व विकास याबाबत माता-भगिनींना मार्गदर्शन केले. श्रीमती पवार एस. एस. यांनी बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी त्यांच्या आहारात विविध पौष्टिक पदार्थांचा समावेश करण्याचे आवाहन केले. तसेच बालकांच्या वाढीवर नियमित लक्ष ठेवून आरोग्याशी संबंधित बाबींकडे वेळीच लक्ष देण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

पोषण कार्यक्रमांतर्गत स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होणाऱ्या पौष्टिक पदार्थांचा योग्य पद्धतीने वापर करून बालकांना सकस व संतुलित आहार कसा देता येईल, याबाबत श्रीमती पाटील एस. सी. यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित मातांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध माहिती जाणून घेतली.

यावेळी उपस्थित पालकांनी आपल्या पाल्यांना केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे न वळवता अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळांमधूनही गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची संधी द्यावी, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात चिमुकल्या बालकांसाठी विविध खेळ, मनोरंजक उपक्रम तसेच जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. बालकांनी उत्साहाने सहभाग घेतल्याने कार्यक्रमाचे वातावरण आनंदमय झाले. बालकांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य आणि मातांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. निरोगी बालक म्हणजे निरोगी समाजाचा पाया हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. बालकांचे आरोग्य व पोषण ही केवळ अंगणवाडी किंवा शासनाची जबाबदारी नसून कुटुंब आणि समाजानेही त्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजापूर बिटातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे सीएचओ डॉ. सचिन गायकर व त्यांची टीम, ग्रामस्थ, पालक, माता-भगिनी आणि अंगणवाडीतील बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संगीता हासे यांनी केले. प्रास्ताविक श्रीमती खैरनार हेमलता यांनी केले, तर उपस्थित मान्यवर, माता-भगिनी, बालके, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे आभार अंगणवाडी मदतनीस श्रीमती छाया खतोडे यांनी मानले.

# मालपाणी विद्यालयात कथाकथन उपक्रम उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, अभिव्यक्तीला आणि कथनकौशल्याला चालना देणारा कथाकथन उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमासाठी साने गुरुजी कथामाला, पुणेचे विश्वस्त शामराव कराळे, ग्रामीण विभागाचे अध्यक्ष बाळासाहेब कानडे, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते सोपान बंदावणे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम एरंडे यांनी केले .

यावेळी शामराव कराळे यांनी कथाकथन कसे करावे, त्याची सुरुवात कशी करावी, कथा प्रभावीपणे कशी फुलवत न्यावी, तसेच कथेमधील पात्रांना हावभाव व आवाजातील चढ-उतारांच्या माध्यमातून कसे सजीव करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी 'साने गुरुजींच्या गोड गोष्टी' मधील भस्ममय मूर्ती व आणखी काही कथा अत्यंत रसाळ आणि प्रभावी शैलीत विद्यार्थ्यांसमोर सादर करत कथाकथनाची प्रात्यक्षिकातून ओळख करून दिली. बाळासाहेब कानडे गुरुजी यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित उद्बोधक कथा कथाकथनाच्या माध्यमातून सादर केली. त्यांच्या कथनातून विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करणारा संदेश मिळाला. सोपान बंदावणे यांनी 'शाळेत जायचं बाळा' हे कृतीयुक्त गीत सादर करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कथा सांगण्याची प्रभावी सुरुवात, कथानकाची गुंफण, पात्रांचे हावभाव, आवाजातील चढ-उतार आणि प्रसंगानुरूप अभिनय यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन मिळाले.

## संपादकीय...

# भक्तीचा उत्सव असावा बेभानपणाचा नव्हे !

सण-उत्सव हे भारतीय समाजजीवनाचे अविभाज्य अंग आहेत. विविधतेत एकता, परंपरा, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन सणांच्या माध्यमातून घडते. गणेशोत्सव असो, नवरात्रोत्सव असो किंवा दिवाळी-दसरा; प्रत्येक सणामागे आनंदाबरोबरच सामाजिक संदेशही दडलेला आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत सण साजरा करण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. उत्साहाच्या नावाखाली मोठ्या आवाजातील डीजे, वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या मिरवणुका, कर्णकर्कश ध्वनी, फटाक्यांचा अतिवापर, रस्त्यांवरील गर्दी आणि कचऱ्याचे वाढते प्रमाण यामुळे सणांचा आनंद काहींसाठी त्रासदायक ठरत आहे. म्हणूनच प्रश्न असा आहे की, आपला उत्सव दुसऱ्याच्या त्रासाची किंमत मोजूनच साजरा करायचा का? गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचा उत्सव आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकजुटीचे आणि जनजागृतीचे स्वरूप दिले. समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, राष्ट्रीय भावना जागृत करणे आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणणे, हा या उत्सवाचा मूळ उद्देश होता. आज गणेशोत्सव अधिक भव्य झाला आहे; परंतु त्या भव्यतेसोबत सामाजिक संवेदनशीलता वाढली आहे का, हा आत्मपरीक्षणाचा विषय आहे. उत्सव म्हटला की संगीत आणि मिरवणूक आलीच. पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम, झांज, हलगी यांसारखी वाद्ये आपल्या संस्कृतीचा भाग आहेत. या पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. मात्र, ध्वनीची मर्यादा ओलांडून तासन्तास कर्णकर्कश आवाज करणाऱ्या डीजेमुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती, विद्यार्थी आणि प्राणी यांना त्रास होऊ शकतो. उत्सव साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; पण त्याचवेळी इतरांच्या शांततेचा आणि आरोग्याचा अधिकारही तितकाच महत्त्वाचा आहे. उत्सवाच्या काळात रस्ते आणि चौकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मांडव उभारले जातात. काही ठिकाणी वाहतुकीचे नियोजन योग्य नसल्याने नागरिकांना कोंडीचा सामना करावा लागतो. रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने किंवा आपत्कालीन सेवांना मार्ग मिळण्यात अडथळा निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. आपल्या उत्सवामुळे एखाद्या रुग्णाला रुग्णालयात पोहोचण्यास विलंब झाला, तर त्या उत्सवाच्या आनंदाला काय अर्थ उरतो? त्यामुळे मिरवणूक आणि सजावटीसोबत वाहतूक व्यवस्थेचेही नियोजन करणे आवश्यक आहे. सणांनंतर निर्माण होणारा कचरा हाही गंभीर प्रश्न आहे. प्लास्टिक, थर्माकोल, निर्माल्य, सजावटीचे साहित्य आणि खाद्यपदार्थांचे अवशेष मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर पडलेले दिसतात. स्वच्छतेचा संदेश देणारा उत्सव दुसऱ्याच दिवशी अस्वच्छता निर्माण करणारा ठरू नये. प्रत्येक मंडळाने 'उत्सव आपला, स्वच्छताही आपली' ही भूमिका स्वीकारली पाहिजे. निर्माल्य संकलन, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा कमीतकमी वापर आणि पर्यावरणपूरक सजावट यावर भर दिल्यास उत्सव अधिक अर्थपूर्ण होऊ शकतो. यंदाच्या सणांमध्ये सामाजिक उपक्रमांना अधिक महत्त्व देण्याची गरज आहे. रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, महिला सुरक्षेबाबत जनजागृती, व्यसनमुक्तीचा संदेश किंवा गरजू कुटुंबांना मदत अशा उपक्रमांमधून उत्सवाचा सामाजिक उपयोग वाढू शकतो. लाखो रुपये केवळ सजावटीवर खर्च करण्यापेक्षा त्यातील काही रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी वापरली तर सणाची खरी प्रतिष्ठा वाढेल. यामध्ये पोलिस आणि प्रशासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे. नियम केवळ कागदावर असणे पुरेसे नाही; त्यांची अंमलबजावणीही तितकीच प्रभावी असावी. ध्वनीमर्यादा, वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे मार्ग, वेळेचे नियोजन आणि सार्वजनिक सुरक्षितता याबाबत स्पष्ट सूचना देऊन त्यांचे पालन झाले पाहिजे. मात्र, प्रशासनानेही केवळ दंडात्मक भूमिका न घेता मंडळांशी संवाद साधून सहकार्याची भूमिका ठेवणे गरजेचे आहे.

# विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी वात्सल्य फाउंडेशनचा पुढाकार; ६१ पुस्तके भेट




युवावार्ता (प्रतिनिधी) माळवाडी (बोटा) - श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासह अभ्यासक्रमाधारित ज्ञानाची भक्कम पायाभरणी व्हावी, या उद्देशाने वात्सल्य फाउंडेशन, पुणे या सेवाभावी संस्थेच्या वतीने बी.एस्सी. (संगणकशास्त्र /माहिती तंत्रज्ञान) आणि बीबीए या अभ्यासक्रमांची क्रमिक पुस्तके मोफत भेट देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या रूपरेषेनुसार बी. एस्सी. (संगणकशास्त्र/ माहिती तंत्रज्ञान) आणि बीबीए या अभ्यासक्रमांच्या सत्र १ व सत्र ३ मधील एकूण ६१ क्रमिक पुस्तकांचा समावेश आहे. ही पुस्तके विद्यार्थ्यांच्या वापरासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला सुपूर्द करण्यात आली. यावेळी आयोजित विशेष कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर व सचिव डॉ. अमित पोखरकर यांच्या हस्ते ही पुस्तके ग्रंथालयासाठी स्वीकारण्यात आली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील विषयांचे सखोल ज्ञान मिळावे तसेच त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनंदाराव ढाकणे यांनी वात्सल्य फाउंडेशनचे आभार मानताना सांगितले की, संस्थेने उपलब्ध करून दिलेली ही पुस्तके विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचा मोठा ठेवा ठरणार आहेत. या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच नवी गती मिळेल. सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांचा पुस्तकांशी असलेला संपर्क काही प्रमाणात कमी होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा पुस्तक वाचनाकडे वळविणे आणि अभ्यासक्रमाशी संबंधित दर्जेदार संदर्भ साहित्य उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे विभागप्रमुख डॉ. प्रशांत काशीद व डॉ. योगेश राऊत यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वात्सल्य फाउंडेशनसाठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. नूतन जोशी यांनी केले. यावेळी प्रा. दीपक जाधव, प्रा. प्रियांका देशमुख, प्रा. वैष्णवी नरवडे, प्रा. केशव झिटे, प्रा. अनुराधा जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# खेळातून करिअर घडवा; रोज एक तास मैदानावर खेळा : डॉ. नारायण जाधव

संगमनेर - खेळातून करिअर घडविता येते. खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकासासोबत आनंदीवृत्ती, निर्णयक्षमता आणि संकटांवर खिलाडूवृत्तीने मात करण्याची क्षमता विकसित होते. शारीरिक विकास चांगला असेल तरच मानसिक विकास आणि त्यातून बौद्धिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे निरोगी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान एक तास मैदानावर खेळले पाहिजे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. नारायण जाधव यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत तालुक्यातील पारेगाव बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जाधव बोलत होते. यावेळी डॉ. जाधव यांनी संगीताच्या तालावर आधारित एरोबिक्सचे विविध प्रकार विद्यार्थ्यांकडून करून घेतले. हसत-खेळत व्यायाम करताना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वर्गातील अभ्यासाचा कंटाळा दूर करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांसोबत विविध मनोरंजक व मैदानी खेळ घेतले.



आखलेल्या गोलातून दुसऱ्या मुलाच्या पायातील फुगा फोडणे, पोटॅटो रेस, काठी शर्यत, रेल्वे आणि बोगदा आदी खेळांमधून विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्याबरोबरच त्यांच्या भावनिक व मानसिक विकासालाही चालना मिळते, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

वर्गातील मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये 'महाभारत', 'आज का अर्जुन', 'मेरी आवाज सुनो' आणि 'राम-रावण युद्ध' यांसारखे खेळ घेण्यात आले. या खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सचोटी, जिज्ञासा, अचूकता, निरीक्षणशक्ती आणि बौद्धिक क्षमता विकसित होण्यास मदत होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पालकांनी मुलांच्या केवळ बौद्धिक विकासालाच महत्त्व न देता त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठीही त्यांना मैदानावर खेळण्याची संधी द्यावी. मैदानी खेळांची सवय लागल्यास मोबाईल गेम, इंस्टाग्राम, व्हॉट्सप आणि वाढता स्क्रीन टाइम यापासून मुलांना काही प्रमाणात दूर ठेवता येईल, असा सल्लाही डॉ. जाधव यांनी पालकांना दिला.

## जाहीर सुचनापत्र

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार**

**(फक्त सभासदांकरीता)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. खांबे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना या सुचनापत्राद्वारे सुचित करण्यांत येते की, आपल्या संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण खातेदार, कर्जदार प्रतिनिधी या मतदार संघातील नैमित्तिक रिक्त एक पदाच्या निवडीकरीता मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचेकडील जा. क्र.५०६८ दिनांक ११/०९/२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. राजेश जोशी, सहकार अधिकारी (श्रेणी-२), संगमनेर, यांची अध्यासी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याने, त्यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक २०/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. संस्था कार्यालय, खांबे, ता. संगमनेर या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सदर विशेष सभेस संस्थेच्या सर्व संचालकांनी उपस्थित रहावे.

दिनांक - ११/०९/२०२६

**(राजेश जोशी)**
**अध्यासी अधिकारी,**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. खांबे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.**


**छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०
फोन - 02425- 225129
dailyyuvavarta@gmail.com

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाउंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**WASAN TOYOTA**
Sangamner
**WE ARE HIRING**

| POST | NAMEEXPER | IENCEQUALIFICATION & SKILLS | VACANCY |
|---|---|---|---|
| TEAM LEADER | 3-4 Years | Graduate • Sales Team Handling • Computer • Reporting | 1 |
| SALES OFFICER | 1–2 Years | Graduate • Sales • Computer | 4 |
| OFFICE BOY | Fresher | 10th Pass • Hardworking • Punctual | 1 |

★ Attractive Salary + Good Incentives ★
Walk-in 15 September 2026
Contact: 9881 2404 56 Email: hr@wasantoyota.com
Address:Panchayat SamitiJawal, SangamnerNagar Road, Sangamner
Interested candidates can walk-in directly for interview on the above date.

**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अँण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे (दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

**नावात बदल**
मी गुळवे मंगेशकुमार चंद्रभान प्रतिज्ञापत्राद्वारे जाहिर करतो की, माझा मुलगा देवांश मंगेश गुळवे याचे नाव नजरचुकीने आर्मी फिल्ड डॉक्युमेंटमध्ये देवांश मंगेश रूग्णालय असे झाले आहे.तरी दोन्ही नावाचा व्यक्ती एकच आहे मुळ नाव – देवांश मंगेश गुळवे, रा. रहिमपूर, ता. संगमनेर जि. अ. नगर
(नोटरी)

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

**नावात बदल**
मी गुळवे मंगेशकुमार चंद्रभान प्रतिज्ञापत्राद्वारे जाहिर करतो की, माझा जुना पत्ता मु. पो. भामाठाण, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर असा असुन तो बदलून आता मु. पो. रहिमपूर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर असा आहे
(नोटरी)

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818







Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
अमृता चहासाठी
सेल्समन प्रमोटर
(२ जागा, महिला)
पगार - १००००
(बेसिक + इंसेन्टीव्ह)
संपर्क- एस. आर. सेल्समन कार्पोरेशन (मार्केट यार्ड, संगमनेर)
7030501936
9904839193

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# राजूर पोलिसांची कामगिरी; दीड लाखांचे १० मोबाईल हस्तगत

## सीईआयआर पोर्टलच्या तांत्रिक विश्लेषणातून शोध


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- राजूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ तसेच चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात राजूर पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तब्बल १० मोबाईल संच शोधून हस्तगत केले असून, त्यांची एकूण किंमत सुमारे दीड लाख रुपये आहे. हे मोबाईल संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत.

गेल्या काही दिवसांत मोबाईल चोरी तसेच गहाळ होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने राजूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली. सीईआयआर (उएखठ) पोर्टलवरील तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गहाळ झालेल्या मोबाईलची माहिती मिळविण्यात आली. त्यानंतर मोबाईलच्या लोकेशनचा मागोवा घेत पोलिसांनी नाशिक, संगमनेर, अहिल्यानगर आणि घोटी परिसरातून १० मोबाईल शोधून काढले.

शोधून काढण्यात आलेले मोबाईल सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या हस्ते त्यांच्या मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त करत राजूर पोलिसांचे आभार मानले.

ही कारवाई अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुक्काम सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या शोध मोहिमेत पोलीस कॉन्स्टेबल उषा मुठे आणि सुवर्णा घोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**मोबाईल हरवल्यास तात्काळ तक्रार करा**

मोबाईल हरवला अथवा चोरीस गेल्यास नागरिकांनी विलंब न करता जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच सीईआयआर पोर्टलवर तक्रार नोंदविल्यास गहाळ मोबाईलचा शोध घेण्यास पोलिसांना मोठी मदत होते. वेळेत तक्रार नोंदवल्यास मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने मागोवा घेऊन तो परत मिळविण्याची शक्यता वाढते, असे आवाहन पोलीस कॉन्स्टेबल उषा मुठे यांनी केले आहे.

# UPI व्यवहारांचा नवा नियम ?

# व्यापाऱ्यांना शुल्क, ग्राहकांना सूट

मुंबई (वृत्तसंस्था)

गेल्या काही दिवसांपासून णझख व्यवहारांवरील मर्चंट डिस्काउंट रेट म्हणजेच MDR संदर्भात सध्या चर्चा सुरू आहे. २,००० पेक्षा जास्त रकमेच्या काही UPI व्यवहारांवर MDR लागू करण्याच्या निर्णयाबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची भूमिका चर्चेत आली आहे. या बदलाचा थेट परिणाम सामान्य ग्राहकांच्या UPI पेमेंटवर होणार नसल्याचे सांगण्यात आले आहे.

ग्राहकांसाठी UPI पेमेंट पूर्वीप्रमाणेच मोफत राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये व्यक्ती ते व्यक्ती म्हणजेच P2P आणि व्यक्ती ते व्यापारी म्हणजेच P2M अशा दोन्ही प्रकारच्या व्यवहारांचा समावेश आहे. त्यामुळे ग्राहकाने UPIच्या माध्यमातून पैसे पाठवताना कोणतेही अतिरिक्त MDR शुल्क देण्याची गरज नसणार आहे.मात्र, व्यापाऱ्यांसाठी काही व्यवहारांमध्ये शुल्क लागू होऊ शकते. २,००० पेक्षा कमी रकमेच्या P2M व्यवहारांवर व्यापाऱ्यांकडून MDR आकारला जाणार नाही. तर २,००० पेक्षा जास्त रकमेच्या काही व्यापारी UPI व्यवहारांवर MDR लागू होऊ शकतो. दिलेल्या माहितीनुसार, MDRचा दर ०.४ टक्के असून प्रति व्यवहार कमाल ३०० शुल्काची मर्यादा सांगण्यात आली आहे. उदाहरणार्थ, ५,००० रुपयांच्या व्यवहारावर ०.४ टक्के दराने २० MDR होऊ शकतो. १०,००० रुपयोंच्या व्यवहारावर ४०, तर ५०,००० रुपयांच्या व्यवहारावर २०० शुल्क होऊ शकते. ७५,००० किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या व्यवहारासाठी कमाल ३०० शुल्क लागू होऊ शकते. या शुल्कातून मिळणारे उत्पन्न UPI व्यवस्थेशी संबंधित विविध भागधारकांमध्ये वितरित केले जाण्याची शक्यता आहे. डिजिटल पेमेंटसाठी आवश्यक तंत्रज्ञान, नेटवर्क आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी या उत्पन्नाचा वापर होऊ शकतो.

# शंभर वर्षीय बहुभाषाप्रभू शायर कृष्णचंद खुराना अनंतात विलीन

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - भारत सरकारच्या श्रम मंत्रालयाचे माजी आयुक्त, बहुभाषाप्रभू कवी, शायर तथा निवेदक के. सी. खुराना ऊर्फ कृष्णचंद खुराना यांच्या निधनाने साहित्य, कला, प्रशासन आणि सांस्कृतिक विश्वातील एक तेजस्वी पर्व अस्तंगत झाले. वयाच्या शंभराव्या वर्षी संगमनेर येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संगमनेरच्या साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

१ जानेवारी १९२६ रोजी पाकिस्तानमध्ये जन्मलेल्या कृष्णचंद खुराना यांनी दिल्ली येथे प्रदीर्घ काळ वास्तव्य केले. असामान्य प्रतिभा, अफाट वाचन आणि भाषेवरील प्रभुत्वाच्या जोरावर त्यांनी हिंदी, उर्दू, पंजाबी, इंग्रजी, फारसी, पश्तू आणि थाई अशा अनेक भाषांवर हुकूमत मिळवली होती. शब्दांचा अचूक उच्चार, आवाजातील माधुर्य आणि भाषेतील आशयपूर्णता यामुळे त्यांनी निवेदक, कवी आणि शायर म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली. चित्रपटसृष्टी आणि संगीतविश्वातील कादर खान, अमजद खान, मोहम्मद रफी, तलत महमूद यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत निवेदक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांच्या प्रभावी आवाजाने आणि शब्दसंपदेने अनेक कार्यक्रमांना वेगळी उंची मिळवून दिली. जर्मनी, जपान, फ्रान्स, अफगाणिस्तान, पाकिस्तान, अमेरिका, सौदी अरेबिया आणि रशिया आदी देशांचा त्यांनी प्रवास केला. अमेरिकेतील ह्युस्टन आकाशवाणी केंद्रावरही त्यांनी काम केले.

विशेष म्हणजे, शंभराव्या वर्षापर्यंत चष्मा, श्रवणयंत्र किंवा कोणाचाही आधार न घेता स्वावलंबी जीवन जगण्याचा त्यांचा प्रवास विलक्षण होता. त्यांची स्मरणशक्ती, भाषेवरील पकड आणि उत्साह अखेरपर्यंत कायम होता. कृष्णचंद खुराना यांचे संगमनेरशी असलेले नाते केवळ परिचयापुरते मर्यादित नव्हते. येथील साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींशी तसेच शेतकरी बांधवांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

# शहागडाच्या विकासासाठी एकजुटीने पुढे यावे - नीलम खताळ



**शहाजीराजे भोसले यांनी वेरूळ येथून सुमारे २०० ते २५० किलोमीटरचा प्रवास करून पेमगिरीच्या शहागडावर येत स्वराज्याचा संकल्प केला होता. हा इतिहास केवळ पेमगिरी किंवा संगमनेर तालुक्या पुरता मर्यादित न ठेवता तो सर्वांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. पेमगिरी येथील शहागडाचा इतिहास महाराष्ट्र भर पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. पुढील वर्षी शहाजीराजांची केवळ प्रतिमा न ठेवता त्यांची मूर्ती तयार करून पालखीतून शहागडावर आणावी.**

**– डॉ. संदीप महिंद,**
**ज्येष्ठ व्याख्याते, कोल्हापूर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

पेमगिरीच्या शहागडाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. हा इतिहास केवळ पेमगिरी किंवा संगमनेर तालुक्यापुरता मर्यादित न ठेवता तो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्या मध्ये पोहोचविण्याची गरज आहे. शहागडाच्या विकासाचा ध्यास आ अमोल खताळ यांनी घेतला असून त्यासाठी पेमगिरीकरांनी आपल्या गावातील राजकारण, गट-तट बाजूला ठेवून एकजुटीने पुढे येण्याची गरज आहे, असे आवाहन आदिशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागडावर हिंदवी स्वराज्य संकल्प दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर यावेळी कोल्हापूर येथील शिवचरित्रकार डॉ संदीप महिंद किल्लेदार फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड किरण झिंजुरके चंदनपुरी चे माजी सरपंच प्रमोद राहणे श्रीक्षेत्र वद्रू येथील सौ अंजली देशमुख सौ वर्षा डुबे यांच्यासह पेमगिरी परिसरातील महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते , ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सौ. खताळ म्हणाल्या, शहागडाच्या विकासासाठी आ. खताळ कोणत्या ही परिस्थितीत मागे हटणार नाहीत. मात्र, या विकासकामांना गती देण्या साठी पेमगिरीकरांनी एकजुटीची ताकद दाखविणे गरजेचे आहे. शहागडावर तीन दिवसांचा हिंदवी स्वराज्य संकल्प दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन विभागाची परवानगी मिळाली आहे. नवरात्रोत्सवापर्यंत आ खताळ यांच्या माध्यमातून हा उपक्रम निश्चितपणे राबविला जाईल.शहागडाच्या विकास कामांना सुरुवात झाली असून, या गडाच्या भिंती उभारण्याचे कामही सुरू झाले आहे. शहागडाचा विकास पूर्ण झाल्यानंतर येथे पर्यटकांची संख्या निश्चितच वाढेल. त्यामुळे पेमगिरीच्या पर्यटन विकासाला मोठी चालना मिळेल,असा विश्वासही सौ नीलम खताळ यांनी व्यक्त केला.

## दिनविशेष

१९९१: लिनक्स कर्नल — या प्रोग्रामिंग लँग्वेजची पहिली आवृत्ती (0.01) इंटरनेटवर प्रकाशित झाली.

१९८३: व्हेनेसा विल्यम्स — पहिल्या कृष्णवर्णीय आफ्रिकन-अमेरिकन मिस अमेरिका बनल्या.

१९७६: स्पेस शटल एंटरप्राइझ — नासाने स्पेस शटल एंटरप्राइझचे अनावरण केले.

१९७४: संयुक्त राष्ट्र — बांगलादेश, ग्रेनाडा आणि गिनी-बिसाऊ संयुक्त राष्ट्रांमध्ये सामील झाले.

१९६५: चाविंडाची लढाई — पाकिस्तान आणि भारत यांच्यात झाली.

१९४८: हैदराबाद मुक्तिसंग्राम — हैदराबादच्या निजामाने हैदराबाद राज्यावरील आपले सार्वभौमत्व समर्पण केले आणि भारतीय संघराज्यात सामील झाले.

१९४४: दुसरे महायुद्ध — सोव्हिएत सैन्याने जर्मनी आणि स्वातंत्र्य समर्थक एस्टोनियन युनिट्सविरूद्ध आक्रमण सुरू केले.

## जन्म

१९८६: रवीचंद्रन अश्विन — भारतीय क्रिकेटपटू

१९५१: डॉ. राणी बंग — समाजसेविका

१९५०: नरेंद्र मोदी — भारताचे १४वे पंतप्रधान

१९४५: भक्ति चारू स्वामी — भारतीय धार्मिक गुरु

१९४०: सुवरा मुखर्जी — भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या पत्नी (निधन: १८ ऑगस्ट २०१५ )

१९३९: रविंद्र सदाशिव भट — गीतकार (निधन: २२ नोव्हेंबर २००८ )

१९३८: दिलीप पुरुषोत्तम चित्रे — लेखक, कवी आणि टीकाकार (निधन: १० डिसेंबर २००९)

१९३७: सीताकांत महापात्र — भारतीय ओडिया कवी, साहित्यिक समीक्षक आणि माजी भारतीय प्रशासकीय अधिकारी — पद्मविभूषण, पद्मभूषण, साहित्य कला अकादमी, ज्ञानपीठ पुरस्कार

१९३२: इंद्रजीत सिंग — भारतीय-इंग्लिश पत्रकार पद्मभूषण,

## मृत्यू

८८७: कोको — जपान देशाचे सम्राट (जन्म: ८३० )

२०२२: माणिकराव होडल्या गावित — भारतीय राजकारणी, खासदार (जन्म: २९ ऑक्टोबर १९३४ )

२०२०: रॉबर्ट डब्ल्यू. गोर — अमेरिकन अभियंते आणि व्यापारी, गोर-टेक्सचे सह-संशोधक (जन्म: १५ एप्रिल १९३७ )

२००२: वसंत बापट — कवी, वक्ते, कलावंत, संपादक (जन्म: २५ जुलै १९२२ )

१९९९: हसरत जयपुरी — हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कवी आणि गीतकार, प्रेमगीतांसाठी विशेष प्रसिद्ध — फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कार (जन्म: १५ एप्रिल १९२२ )

१९९४: व्हिटास गेरुलायटिस — अमेरिकन लॉन टेनिसपटू (जन्म: २६ जुलै १९५४ )

१९३६: हेन्री लुईस ली चॅटॅलिअर — फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ८ ऑक्टोबर १९५० )

१९०८: लेफ्टनंट थॉमस सेल्फ्रिज — विमान अपघातात निधन झालेले पहिले व्यक्ती (जन्म: ८ फेब्रुवारी १८८२ )

१८७७: हेन्री फॉक्स टॅलबॉट — छायाचित्रणकलेचा पाया घालणारे (जन्म: ११ फेब्रुवारी १८०० )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१७ सप्टेंबर**

# लिनक्सचा जन्म! छोट्याशा कर्नलपासून जगभरातील संगणकीय क्रांतीपर्यंतचा थक्क करणारा प्रवास




१९९१ हे वर्ष संगणकाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष मानले जाते. याच वर्षी फिनलंडमधील तरुण संगणकशास्त्र विद्यार्थी लिनस टॉर्वाल्ड्स यांनी लिनक्स कर्नलच्या पहिल्या आवृत्तीची निर्मिती केली. १७ सप्टेंबर १९९१ रोजी लिनक्स कर्नलची 0.01 ही सुरुवातीची आवृत्ती इंटरनेटवर उपलब्ध करून देण्यात आली. पुढे याच प्रकल्पाने जगभरातील संगणक, सर्व्हर, स्मार्टफोन आणि विविध डिजिटल उपकरणांच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली.लिनस टॉर्वाल्ड्स हे हेलसिंकी विद्यापीठात शिक्षण घेत असताना संगणक प्रणालींचा अभ्यास करत होते. त्या काळात त्यांना युनिक्स या ऑपरेटिंग सिस्टमच्या कार्यपद्धतीत विशेष रस होता. मात्र, युनिक्सच्या व्यावसायिक आवृत्त्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे स्वतःच्या संगणकावर कार्य करणारे आणि अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल असे एक छोटे ऑपरेटिंग सिस्टम कर्नल तयार करण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला.सुरुवातीला हा प्रकल्प अतिशय मर्यादित स्वरूपाचा होता. लिनस यांनी ऑगस्ट १९९१ मध्ये इंटरनेटवरील एका चर्चागटावर आपल्या प्रकल्पाची माहिती दिली. त्यांचा उद्देश जग बदलण्याचा नव्हता; तर संगणकावर अधिक चांगल्या प्रकारे काम करणारे स्वतःचे कर्नल तयार करणे आणि त्यातून इतर संगणकप्रेमींचे मत व सहकार्य मिळवणे हा होता. त्यानंतर जगभरातील प्रोग्रामर या प्रकल्पाशी जोडले गेले आणि लिनक्सच्या विकासाला वेग मिळाला.लिनक्स कर्नलची 0.01 आवृत्ती ही आजच्या तुलनेत अत्यंत प्राथमिक स्वरूपाची होती. त्यामध्ये अनेक मर्यादा होत्या आणि ती सर्वसामान्य वापरासाठी तयार केलेली प्रणाली नव्हती. मात्र, या छोट्याशा सुरुवातीमध्ये भविष्यातील मोठ्या संगणकीय क्रांतीची बीजे होती. पुढील आवृत्त्यांमध्ये विविध सुविधा, हार्डवेअर समर्थन, नेटवर्किंग आणि इतर महत्त्वाच्या क्षमता जोडल्या गेल्या.लिनक्सच्या विकासातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्याचे मुक्त स्रोत (ओपन सोर्स) स्वरूप. जगभरातील प्रोग्रामरना त्याच्या स्रोत कोडचा अभ्यास, सुधारणा आणि विकासामध्ये योगदान देता आले. त्यामुळे लिनक्स हा केवळ एका व्यक्तीचा प्रकल्प न राहता जगभरातील तंत्रज्ञान समुदायाचा सामूहिक प्रकल्प बनला.आज लिनक्स कर्नलवर आधारित अनेक ऑपरेटिंग सिस्टम वापरल्या जातात. संगणक आणि सर्व्हरपासून ते स्मार्टफोन, सुपरकॉम्प्युटर, क्लाउड प्रणाली, नेटवर्क उपकरणे आणि विविध एम्बेडेड उपकरणांपर्यंत लिनक्सचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अँड्रॉइडमध्येही लिनक्स कर्नलचा वापर करण्यात आला आहे.१९९१ मध्ये एका विद्यार्थ्याने सुरू केलेला हा छोटासा प्रयोग पुढे जागतिक तंत्रज्ञानाच्या पायाभूत व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनला.

# नरेंद्र मोदी : भारतीय राजकारणातील प्रभावी नेतृत्व

**जन्मदिन विशेष**



नरेंद्र दामोदरदास मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील वडनगर येथे झाला. भारताच्या राजकीय इतिहासात नरेंद्र मोदी हे प्रभावी आणि दीर्घकाळ राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकणारे नेते म्हणून ओळखले जातात. ते भारताचे १४वे पंतप्रधान असून, त्यांनी २०१४ मध्ये प्रथम पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर २०१९ आणि २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांनंतर त्यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली.मोदींचे बालपण वडनगर येथे गेले. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सामान्य होती. त्यांच्या वडिलांचा वडनगर रेल्वे स्थानकाजवळ चहाचा व्यवसाय होता. बालपणापासूनच नरेंद्र मोदी सार्वजनिक जीवन आणि सामाजिक कार्याकडे आकर्षित झाले. तरुण वयात ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी (आरएसएस) जोडले गेले. संघाच्या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक आणि संघटनात्मक कामांचा अनुभव घेतला.१९८०च्या दशकात ते भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सक्रिय झाले. पक्षातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी संघटन उभारणी, निवडणूक नियोजन आणि जनसंपर्क यामध्ये विशेष कौशल्य निर्माण केले. २००१ मध्ये नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी गुजरातमध्ये औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा, वीज, रस्ते आणि प्रशासनातील सुधारणांवर भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली गुजरातच्या विकासाचे मॉडेल राष्ट्रीय राजकारणात चर्चेचा विषय बनले.२०१३ मध्ये भारतीय जनता पक्षाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार घोषित केले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले आणि नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, उज्ज्वला योजना आणि आयुष्मान भारत यांसारख्या विविध योजनांवर भर दिला.२०१६ मध्ये केंद्र सरकारने मोठ्या चलनी नोटांचे विमुद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांच्या सरकारच्या काळात झाला. पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, उत्पादन क्षेत्र, थेट लाभ हस्तांतरण आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवरही त्यांच्या सरकारने विशेष भर दिला.२०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पुन्हा स्पष्ट बहुमत मिळाले आणि नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या कार्यकाळात कलम ३७० मधील बदल, नागरिकत्व सुधारणा कायदा, राम मंदिराच्या बांधकामाचा मार्ग मोकळा होणे आणि कोविड-१९ महामारीतील केंद्र सरकारची भूमिका या प्रमुख घटनांमुळे त्यांचे सरकार चर्चेत राहिले.२०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाले. ९ जून २०२४ रोजी नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग तीन वेळा पंतप्रधान होणारे ते दुसरे भारतीय नेते ठरले.नरेंद्र मोदी यांच्या राजकीय प्रवासात संघटन कौशल्य, प्रभावी जनसंपर्क आणि विकासाच्या मुद्द्यांवर भर ही प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. त्यांच्या समर्थकांकडून त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले जाते, तर विरोधकांकडून त्यांच्या सरकारच्या काही धोरणांवर आणि निर्णयांवर टीकाही केली जाते. त्यामुळे नरेंद्र मोदी हे समकालीन भारतीय राजकारणातील अत्यंत प्रभावशाली आणि चर्चेतील व्यक्तिमत्त्व ठरले आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जड डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# दैनिक युवावार्ता कार्यालयात आ. सत्यजित तांबे यांची सपत्नीक पूजा




संगमनेर - विधानपरिषद सदस्य आमदार सत्यजित तांबे व नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांच्या हस्ते दैनिक युवावार्तामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी युवावार्ता परिवाराशी अनौपचारीक संवाद साधताना आ. सत्यजित तांबे व डॉ. मैथिली तांबे यांनी संगमनेर शहराच्या विकासचा संकल्प सांगितला. सण -उत्सव शांततेत करावे परंतु शहराच्या सुरक्षेस आणि संस्कृतीस बाधा कोणी आणू नये. नागरीकांनी नियमांचे पालन करावे असे आवाहन केले. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांनी आमदार तांबे दाम्पत्यांचा सत्कार केला. आनंद हासे, सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# गणेशमूर्ती विक्रेत्याला भोंदूबाबाने घातला गंडा; सोन्याची अंगठी लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील घारगाव बसस्थानक परिसरात गणेशमूर्ती विक्री करणार्या व्यावसायिकाची हातातील सोन्याची अंगठी साधूच्या वेशात आलेल्या एका भोंदूबाबाने लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी (दि.१४) घडला आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, आंबीखालसा येथील मच्छिंद्र भागुजी कहाणे यांचा घारगाव बसस्थानक परिसरात गणेशमूर्ती विक्रीचा स्टॉल होता. हा व्यवसाय सुरू असतानाच भगवे वस्त्र परिधान केलेला भोंदूबाबा त्यांच्या स्टॉलजवळ आला व एक गणेशमूर्ती हातात घेतली आणि मूर्ती खूप सुंदर आहे असे म्हणत कहाणे यांच्याशी संवाद साधण्यास सुरुवात केली.

त्यानंतर त्याने कहाणे यांचा हात हातात घेत तुमच्या सर्व मूर्तींची विक्री होईल तुम्हाला मोठा नफा मिळेल असे सांगितले. बोलता बोलता त्या भोंदूने कहाणे यांच्या हातात बुक्यासदृश काहीतरी पदार्थ टाकला आणि काही वेळातच तेथून तो निघून गेला. सुरुवातीला



नेमके काय घडले हे कहाणे यांच्या लक्षात आले नाही. मात्र, काही वेळाने हातातील बोटाकडे लक्ष गेले आणि त्यांच्या लक्षात आले, बोटात असलेली सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी गायब झाली आहे. क्षणातच कहाणे यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर यांनी दुचाकी घेत बसस्थानक परिसरात त्या व्यक्तीचा शोध सुरू केला. परिसरात बराच वेळ शोध घेतला; मात्र संबंधित भोंदू कुठेही आढळून आला नाही, अशी माहिती मच्छिंद्र कहाणे यांनी दिली. दरम्यान, अशाप्रकारे संशयित व्यक्तींची माहिती घेऊन पोलीस प्रशासनाने आवश्यक ती चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे. गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भूसुरुंगाच्या स्फोटाने सात घरांचे नुकसान !

## माशेरे वस्ती परिसरात दगडांचा अक्षरशः वर्षाव
## युवक गंभीर जखमी, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : तालुक्यातील वरखडवाडी जवळील माशेरे वस्ती परिसरात दगड फोडण्यासाठी करण्यात आलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटाने मोठा धोका निर्माण झाला. स्फोटाच्या तीव्रतेने उडालेले दगड थेट रहिवासी वस्तीकडे येऊन घरांच्या पत्र्यांवर व भिंतींवर आदळल्याने सात घरांचे नुकसान झाले, तर या घटनेत आयुष परबत गांगड (वय २१) हा युवक गंभीर जखमी झाला. जखमी आयुष याला तातडीने उपचारासाठी संगमनेर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेने माशेरे वस्तीतील नागरिकांमध्ये मोठी घबराट पसरली आहे.


एआय फोटो

जगन्नाथ वसंत देशमुख यांच्या सर्व्हे क्रमांक ३३/२ मधील सुमारे पाच एकर क्षेत्रात दगड फोडण्याचे काम सुरू होते. या कामासाठी भूसुरुंगाचा स्फोट करण्यात आला. मात्र, स्फोटानंतर मोठ्या प्रमाणात दगड हवेत उडून दूरवर फेकले गेले. त्यातील काही दगड माशेरे वस्तीतील घरांवर जाऊन पडले. त्यामुळे घरांच्या पत्र्यांचे तसेच भिंतींचे नुकसान झाले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये काही काळ प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले.

स्फोटाच्या वेळी आयुष गांगड हा युवक जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

### महसूल विभागाकडून नुकसानीची पाहणी

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मंडळ अधिकारी बाबासाहेब दातखिळे यांनी घटनास्थळी पाहणी करून नुकसानीचा पंचनामा केला. या पंचनाम्यात भूसुरुंगाच्या स्फोटामुळे सात घरांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबतची माहिती नायब तहसीलदार किसन लोहरे यांनी दिली.

रहिवासी वस्तीच्या अगदी जवळ दगड फोडण्यासाठी भूसुरुंगाचा वापर करण्यात आल्याने या कामाच्या परवानगीचा आणि सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. स्फोटासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का? स्फोटाच्या वेळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? तसेच रहिवासी वस्तीजवळ अशा पद्धतीने स्फोटकांचा वापर करण्यास नियमांनुसार परवानगी आहे का? असे अनेक प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी करून स्फोटासाठी वापरण्यात आलेल्या स्फोटकांची परवानगी, सुरक्षाव्यवस्था आणि नियमांचे पालन याची तपासणी करावी. तसेच निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक संस्थांसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# अहिल्यानगर जिल्हा बँकेची अंतिम यादी जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा बँकेची अंतिम मतदार यादी मंगळवारी प्रसिध्द झाली. त्यात प्रारूप मतदार यादीत अपात्र ठरलेल्या ३३६ मतदारांपैकी १५९ ठरावास पात्र करण्यात आल्याने अंतिम मतदार यादीत ३८३६ मतदार मतदानास पात्र ठरविण्यात आले आहे. अंतिम मतदार यादीत बिगर शेती, शेतीपूरक मतदारसंघात मतदाराची संख्या वाढली आहे. अहिल्यानगर जिल्हा बँकेचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. प्रशासनाकडून निवडणुकीची तयारी सुरू असून मतदार यादी अंतिम करण्यात आली आहे. आता कोणत्याही क्षणी बँक निवडणुकीची अधिसूचना जारी होण्याची शक्यता वर्तविली जात आहेत.जिल्हा बँकेने १६ जून ते १६ जुलै या कालावधीत ठराव मागवले होते. जिल्ह्यातील ४ हजार १३ संस्थांनी जिल्हा बँकेसाठी ठराव दिले. त्यातील ३३६ ठराव अपात्र ठरवले. १८ ऑगस्टला जिल्हा बँकेच्या मतदारांची प्रारूप मतदार यादी विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी जाहीर केली. त्यात ६७७ ठराव म्हणजेच मतदार होते. प्रारूप मततदार यादीवर आलेल्या हरकतीवर सुनावणी घेतल्यानंतर मंगळवारी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. त्यात ३८३६ मतदार पात्र ठरले आहेत.

प्रारूप मतदार यादीवर ३१ ऑगस्टपर्यंत हरकती नोंदवण्याची मुदत होती. छाननीत अपात्र ठरलेल्या ३३६ मतदारांपैकी २३८ हरकती आल्या. ९८ अपात्र झालेल्यांनी कोणताही आक्षेप घेतला आहे. सुनावणीत त्यातील १५९ हरकतींना ग्रीन सिग्नल दर्शवत त्यांची नावे पात्र ठरवण्यात आली. त्यामुळे अंतिम मतदार यादीत हा आकडा वाढून ३८३६ मतदार झाले.अंतिम मतदार यादीत सोसायटी मतदार संघातील प्रारुपच्या १३६० मतदारांमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. मात्र बिगरशेती मतदार संघात ९१ मतदार वाढले आहेत. तर शेतीपूरक मतदार संघात ६८ मतदारांची वाढ झाली आहे. ही मतदार संख्या चुरस वाढविणारी असल्याचे बोलले जाते.

यंदाच्या निवडणुकीत पुन्हा विखे विरुद्ध थोरात असा सामना रंगणार असे वाटत असतानाच, सहकाराच्या या राजकारणात दोन्ही नेते एकत्र येण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. दुसरीकडे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून तिसरे स्वतंत्र पॅनल उभे केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या राजकीय समीकरणांवर चर्चा सुरू असतानाच, सेवा संस्थांच्या १४ पैकी १० जागांवर नेत्यांमध्ये सहमती झाल्याचे समजते. मात्र, सेवा संस्थांच्या उरलेल्या ४ आणि इतर ७ अशा एकूण ११ जागांवर अजूनही पेच कायम आहे. यामध्ये महिलांसाठीच्या २ जागा, बिगर शेती मतदारसंघ (१), शेतीपूरक मतदारसंघ (१) तसेच अनुसूचित जाती/जमाती , भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय (जइउ) प्रत्येकी १ अशा ३ राखीव जागांवर एकमत झालेले नाही. त्यामुळे या जागांसाठी प्रत्यक्ष निवडणूक होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.


दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❋ कर्ज रक्कम वाढ । ❋ कर्ज व्याजदर कमी । ❋ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25